लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

सोलापूर विमानतळापासून फक्त ५ कि.मी. अंतरावरील १० एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. १ एकर पॉलिहाऊस, १.५ एकर शेडनेट नर्सरीसाठी उपयुक्त.
संपर्कः- 9850530355
9158821555
(594)

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ८६ वा | बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पावसामुळे कांदा सडला; शेतकऱ्यांचे झाले मोठे नुकसान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** इंदापूर तालुक्यातील भांडगाव येथील शेतकऱ्याचे कांद्याचे पीक पावसाने शेतात सडून गेले आहे. त्यामुळे उत्पादित कांदा सध्या अतिशय खराब निघत आहे. त्यामुळे हा कांदा सोलापूर बाजार समितीतून दोनवेळा माघारी आला आहे.

परिणामी, शेतकऱ्याला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

पांडुरंग शिवाजी गायकवाड असे या नुकसानग्रस्त दुर्दैवी शेतकऱ्याचे नाव आहे. गायकवाड यांनी साडेतीन महिन्यांपूर्वी एक एकर क्षेत्रावर सारा पद्धतीने बियाणे विस्कटून कांद्याचे पीक घेतले. या पिकातील आंतरमशागतीची कामे, रासायनिक खते, औषध फवारणी यासाठी पिकाची काढणीपर्यंत सुमारे 40 हजार रुपये खर्च त्यांना आला आहे. हे पीक अडीच महिन्यांचे होते, परंतु सप्टेंबरचा शेवटच्या आठवडा व ऑक्टोबर महिन्यात चांगला पाऊस झाल्याने गेली महिनाभर या पिकाची काढणी पांडुरंग गायकवाड यांना करता आली नाही. त्यामुळे कांदा शेतात सडून जाऊन खराब झाला आहे.

गेल्या आठवड्यापासून या पिकाची काढणी सुरू असून, उत्पादित कांदा हा गोण्यामध्ये भरून दोनवेळा सोलापूर बाजार समितीमध्ये पाठविला. परंतु, तेथेही कांदा स्वीकारण्यात आला नाही. त्यामुळे उत्पन्न तर सोडाच उलट वाहतूक खर्च, गोण्याचा खर्च आदी खर्च खिशातून करावा लागत असल्याचे त्यांचा मुलगा दत्ता गायकवाड यांनी सांगितले.

### उर्वरित कांदा पिकाची काढणी सुरू

सध्या उर्वरित कांदा पिकाची काढणी सुरू असून, शेतमजुरांवर खिशातून खर्च करावा लागत आहे. त्यामुळे या कांदा पिकापासून मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. पावसामुळे खराब झालेल्या कांद्याचे पंचनामे करून शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणीही दत्ता गायकवाड यांनी केली आहे.

## पीक पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांची होतेय लूट ?

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सरकारने चांगल्या हेतूने सुरू केलेल्या महत्त्वाकांक्षी 'एक रुपयात पीक विमा' योजनेत अनेक हिस्सेदार होत आहेत. सततच्या पावसाने पिके नासत असताना दिलेल्या इंटिमेशन (तक्रार) नुसार पंचनामा होईपर्यंत शेतकऱ्यांची घालमेल होत आहे, तर आलेला व्यक्ती पीक निहाय पैसे घेत आहे.

पीक नुकसान पंचनाम्यासाठी कळमण भागात एका अजार्ला (पिकाला) दोनशे, कोंडी पट्ट्यात पाचशे, तर नान्नज भागात सातशे रुपये घेतले असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. जिल्ह्यात यंदाही न थांबणाऱ्या पावसाने खरीप पिकांची दाणादाण उडवली आहे.

यंदा जून महिन्यात खरीप पेरणीसाठी पोषक पाऊस पडल्याने जिल्ह्यात पाच लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली. दरवर्षी ऑगस्ट



महिन्याच्या शेवटपर्यंत होणारी तुरीची पेरणी यंदा चांगला पाऊस पडल्याने लवकर म्हणजे जुलै महिन्यात उरकली.

त्यानंतर सर्वच खरीप पिकांसह कारले, दोडके, टोमॅटो, वांगी व भाज्यांचे क्षेत्रही वाढले होते. मात्र, सप्टेंबर अखेरला व त्यानंतर पडलेल्या पावसामुळे ऊस, केळी वगळता इतर सर्वच पिके पाण्यात गेली आहेत.

पाऊस थांबायचे नाव घेत नसल्याने उभी पिके नासत आहेत. सततच्या पावसाने शेतकरी विमा कंपनीला इंटिमेशन देत आहेत. इंटिमेशन दिल्यानंतर आपली तक्रार पात्र झाली की, अपात्र झाली, हे समजेपर्यंत शेतकऱ्यांची घालमेल होत आहे.

इंटिमेशन पात्र ठरली, तर पंचनाम्याला शेतापर्यंत माणूस येईपर्यंत संपर्क करावा लागतो. पंचनाम्यासाठी आलेला व्यक्ती किती अर्ज (किती पिके) आहेत, हे पाहून पैशांची मागणी करतो. पैशांशिवाय पंचनामा केला जात नाही. पैसे नाही दिले, तर नुकसान कमी दाखविले जाते.

### पंचनामा न करता परत पाठविले

अकोलेकाटी येथे पीक नुकसान पंचनाम्यासाठी काही तरुण आले. ते एका पिकाला दोनशे, तीनशे व त्यापेक्षा अधिक रक्कम मागू लागले. गावातील पदाधिकाऱ्यांनी पंचनामे थांबवून त्यांना परत पाठविले व तत्कालीन तालुका कृषी अधिकारी मनीषा मिसाळ यांच्याकडे तक्रार केली. आठ दिवस कोणीच पंचनाम्याला आले नसल्याने शेतकरी घाबरले. त्यानंतर आलेल्या दुसऱ्या युवकांनी कमी पैसे घेऊन पंचनामे केल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## जरांगे-पाटील पॅटर्नचे सोलापुरात 11 उमेदवार; बार्शीतून राजा माने, तर माढ्यातून श्रीमंत कोकाटेंचं नाव चर्चेत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण लढ्यातून पुढे आलेल्या जरांगे-पाटील पॅटर्न राज्यात चांगलाचा गाजू लागला आहे. या पॅटर्ननुसार जिल्ह्यातील ११ ही मतदारसंघातून उमेदवार उभे करण्यात येणार आहेत. यामध्ये बार्शी मतदारसंघातून राजा माने तर माढा मतदारसंघातून श्रीमंत कोकाटे यांचे नाव चर्चेत आहे.

शनिवारी (ता. १९) छत्रपती शिवाजी महाराज प्रशालेत जिल्ह्यातील ३० इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व कार्यअहवाल समन्वयकासमोर सादर केले होते. तर १२० जणांनी यापूर्वीच अंतरवाली सराटी येथे १२० जणांनी अर्ज व कार्यअहवाल दाखल केले होते. या इच्छुक उमेदवारांमध्ये माढा मतदारासंघातून इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे व बार्शी मतदारसंघातून ज्येष्ठ पत्रकार राजा



माने यांची नावे आहेत. याशिवाय जिल्ह्यातून मारुती गायकवाड, प्रा. रणजित जगताप, प्रा. दीपक पाटील, बाळासाहेब बागल हे देखील इच्छुक आहेत.

मनोज जरांगे-पाटील यांनी जिथे समाजाची ताकद आहे तिथेच उमदेवार द्यावेत, असे सांगितले आहे. दुसरीकडे जिथे एस.सी. एस.टी. यांचे आरक्षण आहे तिथे शक्यतो उमेदवार देऊ नयेत. आरक्षण चळवळीला धक्का लागेल असा एकही उमेदवार देऊ नये, असे सांगितले आहे. जे उमेदवार मराठा आरक्षण लढ्याच्या बाजुने आहेत व पुढे मराठा आराक्षण चळवळीसाठी पाठिंबा देणार आहेत. त्यांच्या पाठीशी मराठा समाजाने आपली ताकद उभी करावी. त्यांच्याकडून ५०० रुपयांच्या स्टँपवर तसे लिहून घ्यावे, असा आदेश मनोज जरांगे-पाटील यांनी दिला आहे.

मराठा आरक्षण लढ्यासाठी तयार करण्यात आलेल्या समितीवर अगदी सुरवातीपासून आहे. यातून माझे नाव पुढे आले असेल. निवडणूक लढण्याची संधी मिळाली तर मी मागे हटणार नाही. पुढील समीकरणे पाहून उमेदवारीबद्दल निर्णय घेतला जाईल.
**- राजा माने,** ज्येष्ठ पत्रकार

चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहिल्याने बदमाशांचे राज्य येते, असे तत्ववेत्ता प्लटो यांनी सांगितले आहे. संसदीय लोकशाहीतून तयार झालेल्या नव सरंमजदारांनी कायम सहकाराच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे शोषण केले आहे. महायुती गेली की महाविकास आघाडी येते. यामुळे सर्वसमान्यांचा कळवळा असणारी माणसे विधीमंडळात जाणे आवश्यक आहे.
**- श्रीमंत कोकाटे,** इतिहास संशोधक

## पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी 41 नामनिर्देशन पत्राची विक्री
## विधानसभा निवडणुकीसाठी अधिसुचना जारी: 29 ऑक्टोबरपर्यंत स्वीकारले जाणार अर्ज





**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर विधानसभा निवडणुकीची अधिसूचना मंगळवार दि. 22 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तर नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती देखील सुरु करण्यात आलेली आहे. 252 पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी मंगळवार दिनांक दि.22 ऑक्टोबर 2024 रोजी 29 जणांनी 41 नामनिर्देशनपत्र पत्र खरेदी केले असून, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

महाराष्ट्र विधानसभेची मुदत 26 नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने 15 ऑक्टोंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना मंगळवार (दि.22) जारी करण्यात आली आहे. या दिवसापासूनच मतदारसंघांत उमेदवारी अर्ज विक्री करण्यात येत असून अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारसह पाच जणांना प्रवेश मिळणार आहे. शंभर मीटर आवारात फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. दि. 29 ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार असून दि 30 ऑक्टोंबर रोजी अर्जाची छाननी होणार आहे. दि 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि.20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून दि. 23 नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.

प्रत्येक मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या 100 मीटर परिसरात उमेदवारांच्या फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना देखील उमेदवारासह फक्त पाच जणांना प्रवेश दिला जाणार आहे. या परिसरात मिरवणूक, सभा घेण्यास तसेच कोणत्याही प्रकारची घोषणा, वाद्य वाजविण्यास प्रतिबंध असणार आहे.

उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी suvidha.gov. In पोर्टल उपलब्ध केले आहे. मात्र अर्ज डाऊनलोड करुन प्रत्यक्षात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागणार आहे. उमेदवारी अर्ज भरताना मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना एकच सूचक असणार आहेत. अपक्ष व इतर पक्षांच्या उमेदवारांना 10 सूचक लागणार आहेत. ते सूचक मतदारसंघातील मतदार असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## पहिल्या दिवशी सोलापूरमधील ११ मतदारसंघातील इच्छुकांनी नेले ४०८ अर्ज!
### सांगोला, करमाळा, शहर मध्यसाठी सर्वाधिक अर्ज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभेच्या रणधुमाळीला सुरवात झाली असून, अर्ज भरण्याच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील २६१ इच्छुकांनी तब्बल ४०८ उमेदवारी अर्ज नेले आहेत. त्यात सांगोला, करमाळा व शहर मध्य या तीन मतदारसंघांतून सर्वाधिक अर्जाची विक्री झाली आहे. जिल्ह्यातील ११ पैकी महायुतीतील भाजपने अक्कलकोट, दक्षिण सोलापूर व शहर उत्तर या तीन मतदारसंघांचे उमेदवार जाहीर केले आहेत. पण, महायुतीकडून आणखी आठ उमेदवार जाहीर व्हायचे आहेत. दुसरीकडे, महाविकास आघाडीने मात्र जिल्ह्यातील एकही उमेदवार जाहीर केलेला नाही. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी २२ ते २९ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे. पण, त्यातील दोन दिवस शनिवार, रविवारी सुटी असल्याने इच्छुकांना पाच दिवसांतच अर्ज भरावे लागणार आहेत. त्यातील मंगळवार (ता. २२) पहिला दिवस संपला.

आता या आठवड्यातील बुधवार ते शुक्रवार या तीन दिवसांत उमेदवारी जाहीर झाल्यावर उमेदवारांना लगेच अर्ज भरावा लागणार आहे. अपक्ष उमेदवारांची संख्या यावेळी खूप असून शहर मध्य, सांगोला, पंढरपूर, दक्षिण सोलापूर, करमाळा, मोहोळ,



बार्शी या मतदारसंघांत मोठी चुरस पाहायला मिळणार आहे. तत्पूर्वी, अर्ज माघारीनंतर नेमक्या लढती कोणाविरुद्ध कोण होतील, हे चित्र स्पष्ट होईल. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांपेक्षा शेवटपर्यंत उमेदवारी ठेवणारे कितीजण व कोण असतील, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. दरम्यान करमाळ्यातून बाळासाहेब वळेकर, अशोक वाघमोडे यांनी तर शहर उत्तरमधून युवराज लिंबोळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**मतदारसंघनिहाय अर्ज (कंसात व्यक्ती)**

| मतदारसंघ | अर्ज विक्री |
|---|---|
| शहर मध्य | ६० (३६) |
| करमाळा | ५४ (३१) |
| सांगोला | ५१ (२९) |
| द. सोलापूर | ४७ (२९) |
| पंढरपूर | ४१ (२९) |
| मोहोळ | ३१ (१५) |
| माळशिरस | ३० (२०) |
| उत्तर सोलापूर | २६ (१६) |
| माढा | २८ (२०) |
| अक्कलकोट | २० (१२) |
| बार्शी | २० (१४) |
| **एकूण** | **४०८ (२६१)** |

### 'शहर मध्य'ची फाईट तगडी होण्याची शक्यता

महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवाराची घोषणा होण्यापूर्वीच शहर मध्य मतदारसंघातून इच्छुक ३६ उमेदवारांनी ६० अर्ज घेतले. त्यात 'एमआयएम'चे उमेदवार फारूक शाब्दी यांचा अर्ज ॲड. जहीर सगरी यांनी नेला. तर बाबा मिस्त्रींचा अर्ज मोहम्मद शेख यांनी, ॲड. अनिल वासम यांनी नरसय्या आडम यांचा आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे तौफिक शेख यांचा अर्ज अखिल नाईकवाडी यांनी नेला आहे.

(पान 2 वर..)

## बेशिस्त रिक्षाचालकांमुळे त्रस्त, रिक्षाचालकांवर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** खरेदीसाठी येणारे नागरिक आणि विविध वस्तूंची विक्री करणारे चाटी गल्लीतील व्यापारी बेशिस्त रिक्षाचालकांमुळे त्रस्त झाले आहेत. या रिक्षाचालकांवर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे. चाटी गल्ली हे शहरातील व्यापारी पेठांमधील प्रमुख ठिकाणांपैकी एक ठिकाण आहे. चाटी गल्ली येथे दिवसभर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची प्रचंड मोठी गर्दी असते. शेजारीच असलेल्या कुंभार वेस, सराफ कट्टा, टिळक चौकातील गदीर्ची यात भर पडते. ग्राहकांना विनाव्यत्यय बाजारात खरेदीसाठी आलेल्या खरेदी करता येणे अपेक्षित असते.परंतु, चाटी गल्लीत बेशिस्त रिक्षाचालकांमुळे ग्राहकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे.प्रवाशांना सोडायला आलेले



बहुतांश रिक्षाचालक आपल्या रिक्षा रस्त्याच्याकडेला न लावता रस्त्याच्या मधोमध लावतात. परिणामी, चाटी गल्लीमध्ये वारंवार वाहतुकीचा खोळंबा होतो. चाटी गल्लीमधील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होते. त्यामुळे खरेदीसाठी आलेले ग्राहक, व्यापारी यांना प्रचंड त्रास होतो. रिक्षाचालकांना नागरिकांनी, ग्राहकांनी हटकले असता रिक्षाचालकांकडून अर्वाच्य भाषा वापरून ग्राहकांना त्रास दिला जातो. बेशिस्त रिक्षाचालकांवर कठोर कारवाईचा बडगा उचलला तरच ग्राहकांना नाहक होणारा त्रास कमी होणार आहे. चाटी गल्लीतील व्यापाऱ्यांकडे खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांना दुचाकी नेण्यासाठीही जागा मिळू नये इतक्या बेशिस्तपणे रिक्षा व्यापारी पेठेमध्ये लावल्या जातात. यामुळे चाटी गल्ली परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे.

काही दिवसातच सण, समारंभ, लग्नसराई सुरू होणार आहे. या काळात चाटी गल्ली आणि परिसरात ग्राहकांची प्रचंड मोठी गर्दी असणार आहे. अशावेळी नागरिकांना रिक्षाचालकांमुळे होणारा त्रास कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

पोलीस प्रशासनाने वाहतूक पोलिसांचे फिरते पथक चाटी केल्यास चाटी गल्लीतील वाहतुकीला शिस्त लागण्यास मोठी मदत होणार आहे. संपूर्ण शहरातील वाहतुकीला शिस्त लावणारे पोलीस प्रशासन सोलापूरच्या बाजारपेठेचा कणा असलेल्या चाटी गल्ली परिसरातील वाहतुकीला कधी शिस्त लावणार? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

पाहिजेत
दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069
संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

# विज्ञान प्राविण्य परीक्षेत एस व्ही सी एस चे यश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विज्ञान प्रावीण्य परीक्षेत एस व्ही सी एस हायस्कूल एमआयडीसी येथील शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे परीक्षेत एकूण 150 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी तेरा विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षेस पात्र ठरले आहेत. प्रशालेतील विज्ञान शिक्षक प्रवीण नवले, रेवणसिद्ध बिराजदार उमेश हाडसंगे यांनी परीक्षा आयोजन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले उत्तीर्ण झालेल्या व प्रज्ञाशोध परीक्षेस पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते अभिनंदन व कौतुक करण्यात आले यावेळी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते, पर्यवेक्षक संतोषकुमार तारके व सर्व विज्ञान शिक्षक- शिक्षिका उपस्थित होते.

# सतत परतीच्या पावसामुळे हाता तोंडाला आलेली पिके वाया जाऊ लागली

**वैराग (कटूसत्य वृत्त):-** गेल्या सात दिवसांपासून दररोज परतीच्या पावसाने सतत आणि जोरदार हजेरी लावल्यामुळे सोयाबीनची सुगी रखडली असून हाता तोंडाला आलेली पिके वाया जाऊ लागली आहेत. त्यात पाऊस सतत कोसळत असल्यामुळे जमिनीचा वापसा लांबत चालला आहे. परिणामी रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी देखील पुढे जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.बार्शी तालुक्यामध्ये मृग नक्षत्रापासून झालेल्या दमदार पावसामुळे सर्व ओढे, नाले, लघु आणि मध्यम प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत. दररोज पाऊस पडत असल्याने काढून 'ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजी शेतात उभ्या असून मळणी यंत्र चिखलामुळे नेता येत नाही. ज्या शेतकऱ्यांची सोयाबीनची काढणी चालू आहे ती दररोजच्या पावसामुळे रखडली असून सोयाबीनच्या शेंगा फुटू लागल्या आहेत. त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे.



सध्या सोयाबीनचा ढासळलेला दर वाढलेली मजुरी, मजुरांची कमतरता, पावसामुळे होणारे नुकसान यामुळे सोयाबीनचे पीक शेतकऱ्यांना तोट्याचे ठरू लागले आहे. सोयाबीन पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होऊन उत्पादन घटले आहे.सतत पडणाऱ्या पावसामुळे मिरची, भेंडी, कांदा, तसेच भाजीपाला सडू लागला आहे. या पिकांच्या मुळ्या कूजल्या असून त्यांची वाढ खुंटली आहे. दलदलीमुळे कांदा पिवळा पडला असून त्याच्या मुळ्या सडल्या आहेत. अशातच कांदा पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झालेला असून फवारणीसाठी शेतकऱ्यांची लगभग सुरू झाली आहे. दररोज पहाटे पडणाऱ्या दुहीचा फटका कांदा पिकाला बसत असून कांदा पिकावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. पडलेल्या करपा रोगामुळे कांद्याचे पीक शेतकऱ्याच्या पदरात पडते की नाही, अशी चिंता बळीराजाला लागून राहिली आहे.सध्या खरीप पिकांचा हंगाम संपत आलेला असून आगामी रब्बी हंगामातील ज्वारी, हरभरा, गहू या पिकांसाठी शेतजमीन तयार करण्यासाठी बळीराजा मशागतीच्या कामात व्यस्त होणार आहे पण सध्या वापसा नाही.यावर्षी सतत पाऊस पडत राहिल्यामुळे खरीप हंगामातील पिकांची आंतरमशागती शेतकऱ्यांना करता आलेल्या नाहीत. त्यामुळे शेतामध्ये गवताचे प्रमाण जास्त असून वापसा नसल्यामुळे शेतकरी तणनाशकाची फवारणी करू लागला आहे. पाऊस कधी थांबणार आणि वापसा कधी होणार या चिंतेने शेतकरी ग्रासला आहे. सध्या परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून जमिनीला पाझर फुटले आहेत. जमीन दलदलयुक्त बनली आहे. वापसा लवकर होणार नसल्याने रब्बी पिकांची पेरणी लांबणार आहे. परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले असून त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या शेतकऱ्यांची अवस्था 'इकडे आड अन तिकडे विहीर' अशी झाली आहे.

# माळशिरसच्या सुकन्येचा दोन ग्रंथांचा प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ज्येष्ठ इतिहास संशोधिका डॉ.सौ लता अकलूजकर यांच्या वराह श्री विष्णूचा तिसरा अवतार आणि वीरगळ एक अभ्यास या दोन्ही ग्रंथांचे प्रकाशन सोहळा नुकताच मंगल भैरव क्लब हाऊस नांदेड सिटी पुणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सोलापुरातील ज्येष्ठ बांधकाम व्यवसायिक किशोरजी चंडक यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले.



यावेळी अँड.नरसिंह लगड, श्रीराम बेंद्रे तसेच मर्वेन टेक्नॉलॉजीचे मनोज केळकर उपस्थित होते. उपस्थितांचे व व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत कु.ऋता कुलकर्णी यांनी केले. किशोर चंडक यांनी दोन्ही ग्रंथ फार वेगळ्या विषयावर आहेत असे स्पष्ट केले तसेच विष्णूंच्या इतरही अवतारावर लेखिकेने लिखाण करावे असाही आग्रह त्यांनी केला. प्रमोद अकलूजकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून सत्कार केला. ज्येष्ठ इतिहास संशोधिका डॉ. लता अकलूजकर यांचे आजपर्यंत ५४ ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत.हा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून अकलूजकर कुटुंबीय आणि कुलकर्णी कुटुंबीय यांनी परिश्रम घेतले.

माळशिरस शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सोमेश्वर महादेव मंदिर आहे. हे मंदिर चाणुक्य कालिन आहे. या मंदिरात वराह व सप्तश्रुंगी कोरीव मूर्ती आहेत.त्या मुर्ती गावकऱ्यांनी सुस्थितीत ठेऊन त्याचे पावित्र्य जपावे असे जेष्ठ इतिहास संशोधिका डॉ.प्राध्यापिका लता अकलूजकर यांनी आवाहन केले आहे.

# संगीताताई जोगधनकर यांनी केला रुपाली चाकणकर यांचा सत्कार

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** महिला आयोगाच्या अध्यक्ष पदी फेर निवड झाल्या बद्दल रुपाली चाकणकर यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला सोलापूर शहराध्यक्षा संगीताताई जोगधनकर यांनी धायरी (पुणे) येथील जनसंपर्क कार्यालय येथे त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अर्चनाताई पाटील - दुलंगे व सुरेखाताई खरटमल, प्रियंका जगझाप उपस्थित होते.



# मार्ग फाऊंडेशनचे महापर्व कला महोत्सव उत्साहात पार पडला



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मार्ग फाऊंडेशनचे संस्थापक संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापर्व कला महोत्सव उत्साहात पार पडला.या महोत्सवात मेहंदी, रांगोळी,पाककला, चित्रकला, हस्तकला यांसह इतर अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध वयोगटातील स्पर्धकांनी कल्पकतेचा आणि कलात्मकतेचा अप्रतिम आविष्कार सादर करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या स्पर्धेमुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध झाले. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व सन्मान प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कला महोत्सवामुळे नवोदित कलाकारांनाही त्यांची कला सादर करण्याची संधी मिळाली आणि अनुभवी कलाकारांबरोबर अनुभवांची देवाणघेवाण यानिमित्ताने करण्यात आली. बक्षीस वितरण समाजसेविका सायरा शेख, सौंदर्य तज्ज्ञ सोनल पांचाळ यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आसिफ यत्राळ यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजिका उषा कसबे, तब्बसूम शेख, मिसबाह शेख,निकिता वाघमारे, वैष्णवी गवळी आणि मार्ग फाऊंडेशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# अॅड.सोमेश वैद्य यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची घोषणा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जनता दक्षिण भारतीय पार्टीने सोलापूरसाठी आ.सुभाष देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे स्वयम्शिक्षा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अॅड.सोमेश वैद्य यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याची घोषणा केली आहे. गुरूवारी (दि. २४) ते उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिन्याभरापूर्वी त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला होता. त्यांना भाजपमधील सहा ते सात माजी नगरसेवकांचा पाठिंबा होता. लिंगायत समाजाचा चेहरा म्हणून त्यांना उमेदवारीची अपेक्षा होती. परंतु पक्षाने विद्यमान आमदारांवर विश्वास ठेवत त्यांनाच उमेदवारी दिली. त्यामुळे आता दक्षिण सोलापूरची जनता हाच माझा पक्ष म्हणून सोमेश वैद्य या मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढविणार आहेत.मागील तीन महिन्यांपासून अॅड. वैद्य यांनी दक्षिण विधानसभा मतदारसंघात आपली मोर्चेबांधणी सुरू केली आहे. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी लक्ष वेधून घेतले. या भागातील शेतकरी,महिला, युवक, बेरोजगार यांच्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्रासाठी नामनिर्देशित केलेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर येथे गठित करण्यात आलेल्या लोकशाहीर आण्णा भाऊ साठे अध्यासन कृती समितीतील नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य आणि क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळ, लष्कर, सोलापूर यांच्यावतीने दि 21/10/2024 सोमवारी रोजी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सार्वजनिक वाचनालय येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंह परदेशी यांच्या शुभ हस्ते व मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते श्रीकांत बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला, संयोजक तथा क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे, क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळाचे अध्यक्ष.. विकास जरिपटके,डाँ,रफीक सय्यद, अत्ताऊल्ला पटेल, विश्वेश्वर गायकवाड, किशोर जाधव सर आदींची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन कृती समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्रा. डॉ.दिगंबर झोंबाडे यांच्यासह समिती सदस्य डॉ. मारुती शिंदे, प्रा. डॉ.परमेश्वर हाटकर, प्रा. डॉ.किशोर जोगदंड, प्रा. डॉ.दीपक देडे, प्रा. डॉ.मारोती घंटेवाड यांचा सत्कार शाल, फेटा, सन्मानचिन्ह, पुस्तक भेट देऊन करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्य पातळीवरील आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक टी. एस. क्षीरसागर यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकामध्ये संयोजक सुरेश पाटोळे यांनी लोकशाहीर आण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र सोलापूर विद्यापीठात व्हावे यासाठी संघर्ष केलेल्या सर्व नेते, कार्यकर्ते आणि अभ्यासक यांचे आभार मानले. पुढील काळात या अध्यासन केंद्रातून समाजाला दिशा देणारी सांस्कृतिक चळवळ उभी राहील अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी अध्यासन कृती समितीतील जेष्ठ सदस्य प्रा. डॉ.मारुती शिंदे यांनी, " अण्णा भाऊंनी निस्वार्थीपणे लेखन केले. त्यांचे लेखन मानवाधिकारवादी होते. त्यांनी लेखनाची पारंपारिक चौकट मोडून काढली. पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून,ती कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरली आहे हा विज्ञानवाद अण्णाभाऊंनी सांगितला. या अध्यासन केंद्रास विद्यापीठाने आणि महाराष्ट्र शासनाने पूर्ण आर्थिक मदत करावी." या शब्दात आपले मत व्यक्त केले.

जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी, "अध्यासन केंद्रातून महापुरुषांच्या विचाराचा मागवा घेतला जावा. हे अध्ययन केंद्र महाराष्ट्र राज्यात आदर्श असे अध्यासन केंद्र बनेल."असा विश्वास व्यक्त केला.

नूतन अध्यक्ष डॉ. दिगंबर झोंबाडे यांनी, " लोकशाहीर आण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र उभा रहावे ही मागणी बहुजन समाजातून मागील अनेक वर्षापासून करण्यात येत होती. हे अध्यासन केंद्र होण्यासाठी माजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे आणि इतर अनेक नेते आणि कार्यकर्ते यांनी विशेष प्रयत्न केले. ज्याप्रमाणे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे म्हणाले होते, 'मला लढा मान्य आहे, रडगाणे नव्हे', त्याप्रमाणे या अध्यासन केंद्रातील आम्ही सर्व पदाधिकारी सर्व अडचणीवर मात करून अध्यासन केंद्र नावारूपाला आणू. या अध्यासन केंद्रात अण्णा भाऊंच्या साहित्यावर विशेष संशोधन होईल. त्याचबरोबर संशोधन करणाऱ्याला सर्वोत्परी मदत कृती समितीकडून केली जाईल. " या शब्दात आपले मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ओंकार पाटोळे, अभिषेक हाटकर, अक्षय गायकवाड, महेश तेजबिंदे, कांबळे सर, आदींनी परिश्रम घेतले.

# विहिरीत पडलेल्या लांडग्याला मिळाले जीवदान



**मोडनिंब (कटूसत्य वृत्त):-** सांगोला येथील साळुंखे वस्ती या ठिकाणी विहिरीत पडलेल्या लांडग्याला पक्षी व सर्पमित्र संदेश पलसे यांच्या प्रयत्नामुळे जीवदान मिळाले. शेतातील विहिरीत लांडगा पडला असल्याचे शेतीमालक मारुती शंकर साळुंखे यांना निदर्शनास आले. ही घटना पाहताच त्यांनी सांगोला येथील सर्प व पक्ष मित्र पलसे यांना फोन द्वारे माहिती दिली. वन कर्मचारी वनिता इंगोले व गोवर्धन वरकुटे यांना फोन द्वारे ही माहिती पलसे यांनी दिली. वन कर्मचारी आणि नागरिकांच्या मदतीने आज दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास लांडग्याला विहिरीतून व्यवस्थित बाहेर काढण्यात आले. विहिरीतून बाहेर काढल्यानंतर जाळी उघडताच लांडग्याने निसर्गात धूम ठोकली. सोनू खडतरे लखन चव्हाण योगेश साळुंखे यांनी विहिरीत पडलेल्या लांडग्याला जीवदान देण्यास महत्त्वाची भूमिका बजावली या विशेष कामी नागरिकांनी संदेश पलसे यांचे कौतुक केले.

# राजराजेश्वरी प्रशालेचे तायक्वांदो स्पर्धेत सुयश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

**यशस्वी खेळाडू :**

१४ वर्षोवयोगटातील (मुले) श्रीचरण व्यंकटेश निली, देवराज हडपद, सतीश बंडा, रामचरण बोडा,१४ वर्षोवयोगटातील (मुली)नंदिनी मगजी, श्रद्धा माने, कीतीर्का सिह.१७ वर्षोवयोगटातील (मुले) आदर्श गाडेकर, रामचरण बोडा, समर्थ बेंद्रे १७ वर्षोवयोगटातील (मुली) प्रियंका काकी, दर्शनी चव्हाण, रागिनी मगजी सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख चंद्रशेखर पाटील, गुरुबाळय्या स्वामी, विश्वजीत मरबे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, सचिव रविशंकर कुंभार, प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार व शिक्षक वृंदानी अभिनंदन केले.

# २० वर्षाच्या प्रदीर्घ देश सेवेनंतर जाधव हे सेवानिवृत्त झाले

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** २० वर्ष सीमा सुरक्षा बल येथे आपली प्रामाणिकपणे देशसेवा बजावल्यानंतर मेजर राहुल राजेंद्र जाधव हे सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त मु.पो. गलंदवाडी (तालुका-मोहोळ) येथील नागरिकांनी मेजर जाधव यांचा भव्य नागरी सत्कार केला. २००४ साली सैन्यात भरती झालेले मेजर जाधव यांनी आजवर जम्मू काश्मीर, राजस्थान, पश्चिम बंगाल, ओडिसा, त्रिपुरा, गुजरात अशा दुर्गम ठिकाणी आपली देश सेवा इमाने इतबारे बजावली. सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या हस्ते हा सत्कार समारंभ संपन्न झाला. मेजर जाधव यांचे वडील राजेंद्र जाधव व आई यांना नेहमी वाटायचे कि आपल्या मुलाने देशसेवेत कार्यरत होऊन आपले कर्तव्य बजावले पाहिजे, त्यांच्या विश्वासाला सत्यात उतरवीत त्यांचा मुलगा राहुल हा पहिल्याच प्रयत्नात देश सेवेत रुजू झाला. मेजर राहुल जाधव यांचे प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण हे केम येथे झाले. आपल्या गावासाठी हा आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असल्याने मेजर जाधव यांची ग्रामस्थांनी मोटरसायकल वरून रॅली काढत त्यांच्या कर्तव्याला सलाम केला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अजिंक्यराणा पाटील, मेजर चंद्रकांत राऊत, मेजर सोमनाथ भिलार, तात्यासाहेब मासाळ, पो.पा. अनिल माने, आबासाहेब माने, दादा माने, सिद्धेश्वर मेटकरी, अण्णा सुळे, रामेश्वर शिंगाडे, अतुल शिंदे सो., मनोज मस्के, तात्या गोफणे, रंगनाथ माने, ज्ञानेश्वर माने, अक्षय थिटे, पो.पा. विठ्ठल थिटे, बंटी पाटील यांच्यासह समस्त गलंदवाडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर क्षिरसागर यांनी केले तर आभार हे उमाकांत जाधव यांनी व्यक्त केले.

# शुक्रवारपासून सकाळी 6.25 वाजता विवेक घळसासी यांचे ऑम्फी थिएटरमध्ये निरूपण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा दक्षिण सोलापूर आणि आर्यन क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. 25, शनिवार दि. 26, आणि रविवार दि.27 ऑक्टोबर 2024 रोजी सकाळी 6 वा. 25 वाजता लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर येथे विवेकाची अमृतवाणीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पूर्णयोग, पूर्णयोग : अंतरंग साधना आणि पूर्णयोगातील गतिरोध या तीन विषयावर ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी हे आपल्या अमृतवाणीतून वैचारीक दीपोस्तव साजरा करीत असल्याची माहिती मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे रांनी दिली.



गेल्या 14 वर्षापासून अखंडपणे विविध विषयावर दीपावलीपूर्व बौध्दिक मेजवानी देण्याची परंपरा विवेकाच्या अमृतवाणी मधून निरूपणकार विवेकजी घळसासी करीत आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर आणि आर्यन क्रिएशन यांच्या वतीने हा वैचारिक दिपोत्सव साजरा करण्यात येत असून यासाठी पु ना गाडगीळ यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. विवेकाच्या अमृतवाणी मधून यंदाच्या वर्षी पहिल्या दिवशी पूर्णयोग, दुर्सया दिवशी पूर्ण योग - अंतरंग साधना, आणि तिर्सया दिवशी पूर्णयोगातील गतिरोध अशा तीन दिवसीय निरूपणातून वैचारीक दीपावली साजरी होणार आहे. दिवाळी पूवीर्ची पहाट चांगला विचाराने सुरू व्हावी दिवाळीची सुरूवात मंगलमय वातावरणात बौध्दिक मेजवानीने विवेकाच्या अमृतवाणीमधून केली जात आहे. यापुर्वी प्रभु श्रीराम, महाबली हनुमान, श्रीकृष्ण, चाणक्य, रामायण, महाभारत यावर प्रवचन करण्यात आले असून या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद देत सभागृहात मोठ्या संख्येने गर्दी केली होती. विवेक घळसासी यांच्या रसाळवाणीतून आलेल्रा प्रत्येक विषयाचे व्याख्यान ऐकून रसिक श्रोते मंत्रमुग्ध होतात. दिवाळीतील गोड फराळाचा आनंद घेण्यापूर्वी बौध्दिक विचारांची मेजवानी विवेकाची अमृतवाणी यातून मिळते.

सकाळी 6 वाजून 25 मिनिटांनी विवेक घळसासी यांचे निरूपण वेळेवर सुरू होऊन वेळेवर सकाळी 7.30 वाजता संपणार आहे. तरी या मंगलमय बौध्दिक आणि वैचारीक मेजवानी असलेल्या विवेकाची अमृतवाणी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहन मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर आणि कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांच्याकडून करण्यात आले.

# भाजपाने विश्वासात न घेतल्यास शिवसेना विरोधात काम करणार : सतीश सपकाळ

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नेहमीच शिवसेनेला भाजपाकडून सापत्न वागणूक देत असते. माढा लोकसभा असो वा विधानसभा असो युतीधर्म पाळल्या जात नसल्याने शिवसेना शिंदे गटाचे माळशिरस तालुक्यातील पदाधिकारी भाजपशी फारकत घेऊन आहेत.भाजपाने शिंदे गटातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेतल्यास माळशिरस तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी वेगळा निर्णय घेऊन भाजपा विरोधात काम करणार असल्याचे मत शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य सतीश सपकाळे यांनी घेण्यात आलेल्या बैठकीत व्यक्त केले.यावेळी घेण्यात आलेल्या बैठकीस तालुका संघटक समिर शेख, उपाध्यक्ष संतोश गोरे, माळशिरस शिवसेनेचे महादेव जगताप, अकलूज रणजीत गायकवाढ, महेश पवार, बापू क्षीरसागर,लखन वावरे, विठ्ठल शिंदे, राहूल खिलारे, विजय बरडकर तसेच महिला आघाडीच्या निता शिंदे, रोहिणी आहिरे, मोनाली शिंदे, उज्वला गिरमे, रंजना शिंदे, तसेच माळशिरस तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी व महिला आघाडीच्या महिला या बैठकीसाठी उपस्थित होत्या.

